**तक्रारदाराचा उलटतपास : जाब देणारतर्फे श्री. वाय. आर. मार्लापल्ले वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :**

1. माझे आज रोजी 52 वर्षे वय आहे. मारूती नगर, मयुर पार्क, सर्व्हे क्र. 188, औरंगाबाद हा पत्ता मी कंपनीमध्ये सांगितलेला आहे. आजही माझा तोच पत्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी 30/07/1995 रोजी मी ट्रेड टेक्निशियन या पदावर कंपनीमध्ये मी ईलेक्ट्रिशियन म्हणून मी नेमणूक झालेलो आहे. मी ईलेक्ट्रिशियन म्हणून जॉईन झालेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी नोकरी संपुष्टात आली त्यावेळेस माझे पद असोसिएट मॅनेजर असे होते. माझे रूजू झाल्यापासून असोसिएट मॅनेजर होईपर्यंतच्या काळामध्ये दोन वेळा पदोन्नती झालेली आहे. मी रूजू झालो त्यावेळेस माझा पगार रू. 2,500/– होता. माझी नोकरी संपुष्टात आली त्यावेळेस माझा मासिक पगार रू. 1,10,000/– होता. ट्रेड टेक्निशियन हे पद एम–9 या ग्रेडमध्ये होते. असोसिएट मॅनेजर हे पद एम–7 या ग्रेड मध्ये होते. हे म्हणणे खरे आहे की, असोसिएट मॅनेजर हे पद एम–6 या ग्रेड मध्ये येते. हे म्हणणे खरे आहे की, एम–6 या ग्रेडचे पद हे एम–9 या ग्रेडच्या पदापेक्षा वरिष्ठ पदाचे आहे. मी ज्या वेळेस रूजू झालो त्यावेळेस मॅनेजर यांना रिपोर्टींग करत होतो. माझी नोकरी संपुष्टात आली त्या वेळेस मी मॅनेजर यांना रिपोर्टींग करत होतो. साक्षीदारास उलटतपासामध्ये नि. यु–4 वरील अ.क्र. 1 वरील पत्रामधील पान क्र. 9 दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या ट्रान्सफर लेटरप्रमाणे माझे रिपोर्टींग व्हाईस प्रेसिडेंट (ऑपरेशन्स) यांच्याकडे होते. सदर पत्राला **<u>नि. यु–18</u>** देण्यात येत आहे.

2. मी माझे पदाला (डेझिग्नेशनला) कधीही आक्षेप घेतलेला नाही. कोणत्या पदाला काय काम दयावे हे व्यवस्थापनाचे काम आहे. मी माझे पदाप्रमाणे काम दिलेले नाही त्याबाबत कधीही आक्षेप घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या सर्व्हिस कंडीशन कंपनीच्या नियुक्तीपत्राप्रमाणे, कंर्फमेशन लेटर व कंपनी पॉलिसीनुसार ठरले जाते. हे मला माहिती नाही की, कामगाराबाबतचे सर्व्हिस नियम

मॉडेल स्टॅण्डींग ऑर्डरप्रमाणे निश्चीत केले जाते व त्याप्रमाणे नियमन केले जाते. मॅनेजमेंटने मला स्वतःचा ईमेल आयडी दिलेला होता. ashok.adhav@stl.tech हा ईमेल आयडी होता. साक्षीदारास उलटतपासामध्ये **नि. सी–8** वरील अ.क्र. 1 पान क्र. 1 ते 53 दाखवण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, **नि. सी–8** वरील अ. क्र. 1 पान क्र. 1 ते 53 वर माझा ashok.adhav@stl.tech ईमेल आयडी नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझा ईमेलआयडीचा पासवर्ड कोणाशीही शेअर केलेला नाही व कंपनीच्या व्यवस्थापनाने मी ईमेल आयडी पासवर्ड दुस–याला शेअर केला असा आक्षेप घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, **नि. सी–8** वरील अ.क्र. 1 पान क्र. 1 ते 53 वरील ईमेलआयडीवर मी मेल पाठवलेले आहेत व त्या ईमेल आयडीवर मला मेल आलेले आहेत व मी त्या मेल आयडीचा वापर केलेला आहे. सदर **नि. सी–8** वरील अ.क्र. 1 पान क्र. 1 ते 53 यास **नि. सी–15 (एकत्रीतपणे पान क्र. 1 ते 53)** देण्यात येत आहे.

3. हे म्हणणे खरे आहे की, दर वर्षी कंपनीकडून कामाबाबत पगार वाढ व पदोन्नती दर वर्षी ॲन्युअल अप्रायझल होत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी जे काम करत होतो ते काम अत्यंत जबाबदारीचे होते. मी जे कागदपत्र दाखल केलेले आहेत त्या व्यतिरिक्त काहीही कागदपत्र दाखल करण्याचे राहिलेले नाहीत. **नि. यु–17** वरील कागदपत्र माझेकडे 2002 च्या नंतर पासून आहेत. **नि. यु–17** वरील मूळ लॉगबुक दस्त कंपनी घरी घेवून जावू देत होती. मी **नि. यु–17** वरील मूळ लॉगबुक घरी घेवून जाण्यासाठी कोणाची परवानगी घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, **नि. यु–17** वरील लॉगबुकचा दस्त मूळतः अस्तित्वात नाही व तो बनावट तयार करुन दाखल केलेला आहे. मी माझे तक्रारीतील व शपथपत्रामध्ये नमूद केलेल्या कामाच्या संदर्भात त्यास पुष्टी देण्यासाठी अभिलेखावर दस्त ऐवज दाखल केलेले आहेत. माझेकडे कामाच्या संदर्भात पुष्टी देण्यासाठी अभिलेखावर जे दस्त ऐवज दाखल केलेले आहेत तेच आहेत त्या व्यतिरिक्त दुसरे दस्त ऐवज नाहीत.

**<u>उलटतपास वकिलांच्या विनंतीवरून पुढील तारखेपर्यंत तहकूब.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.02.23 13:31:37 +0530

LABOUR COURT MAHARASHTRA

**(द.शं.खेडेकर)**

दिनांक–18/02/2026

प्र. न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 2 औरंगाबाद